# मुकुल माधव फाउंडेशनमुळे विश्वासचे उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण



**पुणे :** उच्च शिक्षण घेऊन कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बदलण्याचे, आयुष्यात यशस्वी होणे हे विद्यार्थीदशेत असणाऱ्या प्रत्येकाचे महत्त्वाचे स्वप्न असते. दहावीची परीक्षा देऊन, आयुष्याच्या नव्या टप्प्याला सामोरे जाण्याचे स्वप्न बघणारा विश्वास शिंदे हा असाच एक हुशार विद्यार्थी. दुर्दैवाने नववीत असताना विश्वासला मम्प्स अटॅकचा सामना करावा लागला, ज्यामुळे त्याला कायमचे बहिरेपण आले. बेताची आर्थिक परिस्थिती आणि कायमच्या बहिरेपणाचे अनपेक्षित संकट, या सत्याचा धीराने सामना करत विश्वासने दहावीची परीक्षा ८०% गुण मिळवून उत्तीर्ण केली आणि रत्नागिरी येंथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा अभ्यासक्रमास प्रवेश घेतला. शारीरिक अडचणींचा सामना करतच उच्च शिक्षणाचा प्रवास सुरू केलेल्या विश्वासच्या स्वप्नांवर मुकुल माधव फाउंडेशनने विश्वास ठेवला. फक्त शारीरिक अडचणीवर मात करण्यापुरते नाही तर उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यातही मुकुल माधव फाउंडेशनने विश्वासला साथ दिली.